महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

शुक्रवार ❖ १० जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १५६ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शैक्षणिक संस्थांचे बळकटीकरण करा - मुख्यमंत्री

## महाराष्ट्राच्या 'व्हिजन १००चा' मुख्यमंत्र्यांकडून आढावा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

मुंबई :आरोग्य यंत्रणेतील सर्व घटकांचे मूल्यमापन चांगल्या संस्थेकडून करण्याचे आणि रुग्णकेंद्रित आरोग्य व्यवस्था व दर्जेदार सेवा निर्माण करण्यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. महसूल, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आदी खात्यांच्या १०० दिवसांच्या आराखड्याचा आढावा फडणीस यांनी घेतला. या वेळी त्यांनी हे आदेश दिले.

फडणवीस पुढे म्हणाले की, सर्व शैक्षणिक संस्थांचे बळकटीकरण करा, औषध व अन्नपदार्थातील भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करावी, वैद्यकीय शिक्षण महाविद्यालय परिसरात विद्यार्थी आणि परिसर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी, आयुर्वेदिक महाविद्यालयामार्फत प्रकृती परीक्षण अभियान, योगा सेंटरची स्थापना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या छतावर सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. तसेच वैद्याकीय संशोधन केंद्रांचे बळकटीकरण करणे, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख करावी व योजनेत सुधारणा करावी, वैद्याकीय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेपासून ते उत्तीर्ण होईपर्यंतच्या शैक्षणिक प्रक्रियेचे व्यवस्थापन करावे, आदी सूचना फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

'आपले सरकार' संकेतस्थळाद्वारे सध्या ५३६ सेवा देण्यात येत असून, त्यांचा राज्यातील नागरिकांना चांगला लाभ होत आहे. त्यामुळे ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते पुढे म्हणाले की, गतिमान व पारदर्शक प्रशासनासाठी नागरिकांना 'आपले सरकार' संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. आता अधिक सक्रियतेने आणि सुलभपणे व्यापक स्वरुपात या संकेतस्थळाद्वारे नागरिकांना जास्तीत जास्त ऑनलाईन सेवा उपलब्ध होतील, यादृष्टीने नियोजन करण्यात यावे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी आयोगाची कार्यपद्धती व भविष्यकालीन योजनांबाबत यावेळी सविस्तर माहिती दिली.

### कोणत्याही निबंधक कार्यालयात दस्तनोंदणी

**राज्यातील कोणत्याही भागातील नागरिकास कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता येण्यासाठी 'एक राज्य, एक नोंदणी' संकल्पना राबविण्यात येणार आहे. तसेच घरबसल्या नागरिकांना दस्त नोंदणी करण्यासाठी महसूलविषयक काही दस्त नोंदणीसाठी चेहराविरहित (फेसलेस) प्रणाली राबविण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. महसूल, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आदी खात्यांच्या १०० दिवसांच्या आराखड्याचा आढावा फडणीस यांनी घेतला.**



### लोकाभिमुख योजनांमधील

# उत्पन्नाची अट शिथील करा

## - खासदार नरेश म्हस्के

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणेः** ठाणे महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागात सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महापालिका क्षेत्रातील गरीब व गरजू महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. यामधील काही योजनांसाठी असलेली उत्पन्नाची अट रद्द करून केशरी व पिवळी शिधापत्रिका ग्राह्य धरावी, जेणेकरून या योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजू महिलांना घेता येईल अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना पत्रान्वये केली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून गरीब व गरजू महिलांसाठी विविध योजना राबविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. या योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे ग्रासलेल्या असतात, किंबहुना त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे रोजगाराचे साधन नसल्यामुळे त्यांना उत्पन्नाचा दाखला सादर करणे शक्य नसते, तसेच विधवा महिलांना देखील उत्पन्नाचा दाखला सहजरित्या उपलब्ध होत नाही, यासाठी त्यांना संबंधित विभागाकडे वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. यामध्ये त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे अनेक महिला या योजनांपासून वंचित राहू शकतात. त्यामुळे उत्पन्नाच्या दाखल्याची अट शिथिल करावी, अशी मागणी गरजू महिला व बहुतांशी माजी नगरसेविकांनी मागणी खासदार नरेश म्हस्के यांचेकडे मागणी केली आहे.

'महाराष्ट्र राज्यामध्ये 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना' राबवित असतांना केशरी व पिवळी शिधापत्रिका यावर रक्कम एक लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाची नोंद आहे अशी शिधापत्रिकेची छायांकित प्रत स्वीकारुन लाभ देण्यात आला आहे. याच धर्तीवर ठाणे महापालिकेच्या महिला व बालकल्याण कल्याणकारी योजनांकरिता तहसिलदार यांचेकडील उत्पन्न दाखला किंवा पिवळी व केशरी शिधापत्रिका यावर रक्कम एक लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न नोंद असलेली छायांकित प्रत असा बदल करुन महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना क्र. ५, ६ व ७ साठी निश्चित केलेली उत्पन्नाच्या दाखल्याची अट शिथील करणेबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी आयुक्तांना लेखी सूचना केली आहे.



# महाविकास आघाडीला धक्का

## राज्यपाल नियुक्त आमदारांची याचिका फेटाळली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ वार्ताहर

**मुंबई** : राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या प्रकरणात महाविकास आघाडीला गुरुवारी धक्का बसला आहे. या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका फेटाळली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला धक्का बसला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कोल्हापूर शहराध्यक्ष सुनील मोदी यांनी ही याचिका दाखल केली होती. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात आपण सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत, असे सुनील मोदी यांनी म्हटले आहे.

राज्यपाल नियुक्त आमदार नियुक्ती प्रकरणात महाविकास आघाडीला धक्का बसला आहे. राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या विरोधात दाखल झालेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायमूर्ती बोरकर आणि न्यायमूर्ती उपाध्याय यांच्या खंडपीठात ही याचिका दाखल होती. ती फेटाळल्यानंतर याचिकाकर्ते सुनील मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयात या निर्णयास आव्हान देणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, घटनेचा आधार घेऊन याचिका फेटाळली आहे का? हे आम्हाला तपासावा लागेल. या याचिकेवर सुनावणी दरम्यान आम्ही अनेक राज्यांचे दाखले दिले होते. मात्र न्यायालयाने त्याचा विचार केलेला दिसत नाही. न्यायालयीन प्रक्रियेत भाजपच्या लोकांचा हस्तक्षेप वाढला आहे. या प्रकरणात देखील भाजपच्या काही लोकांचा हात आहे असा आम्हाला वास येत आहे, असा आरोप सुनील मोदी यांनी भाजपवर केला. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. या निकालामुळे महायुतीकडून दिलेल्या नव्या सात आमदारांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा आहे. यापूर्वीच महायुतीने सात जणांची नावे राज्यपालांकडे पाठवली आहे. आता आणखी पाच नाव देखील महायुतीकडून जाहीर होईल, अशी अपेक्षा आहे. त्यावर बोलताना सुनील मोदी यांनी महायुती नव्याने करण्यात येणाऱ्या या सर्वच राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तीवर आम्ही आक्षेप घेणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, राज्यपाल नियुक्त आमदारांचा विषय महाविकास आघाडी सरकार असल्यापासून प्रलंबित आहे. त्यावेळी तत्कालीन राज्यपालांनी त्या नियुक्तीला परवानगी दिली नव्हती.

# ठाणे जिल्ह्यातील जल योजनांची पाणी पुरवठा मंत्र्यांकडून पाहणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**ठाणे ,दि.०९:** ठाणे जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित कराव्यात, संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच कंत्राटदारांनी नेमून दिलेली कामे गांभीर्यपूर्वक लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशा अत्यंत कठोर शब्दात सूचना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिल्या.



### मिशन मोडवर काम करून जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा - मंत्री गुलाबराव पाटील

राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. मंत्री श्री.पाटील यांनी पडघा, वाशिंद, आसनगाव, चेरपोली, खर्डी येथे भेट दिली. या दौऱ्यादरम्यान मंत्री महोदयांसमवेत आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्हा परिषद जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक प्रमोद काळे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता तन्मय कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.

"

**नुकतीच मंत्रालयात ठाणे आणि शहापूर जिल्ह्याची आढावा बैठक घेण्यात आली. पाणीपुरवठा संबंधित काही योजना आहेत, त्या योजनांची पाहणी करणे, अपूर्ण योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कार्यवाही आणि अंमलबजावणी गतिमान करणे, त्यासोबतच बंद असलेली कामे बंद का आहेत, त्यासंबंधी अडचणी काय आहेत, त्या जाणून घेण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यात स्थानिक आमदार तसेच लोकप्रतिनिधीही सोबत असणार आहेत. आपल्या देशाचा 'हर घर जल...हर घर नल' हा एक ड्रीम प्रोजेक्ट आहे. तो पूर्णत्वास येण्याकरिता हा दौरा आहे. त्यानुषंगाने या दौऱ्यात माहिती घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.**

**❍ गुलाबराव पाटील**
**पाणी पुरवठा मंत्री**

# राज्यभरातील कार्यकर्त्ये आणि पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

विधानसभेत घवघवीत यश मिळवणाऱ्या शिवसेना पक्षात आज राज्यातील विविध जिल्हयांतील हजारो कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. ठाण्यातील आनंद आश्रम येथे पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. ठाणे, पालघर, अकोला, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर पुणे, अहिल्यानगर, नागपूर या जिल्ह्यांतील उबाठा, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मनसे, आम आदमी पार्टीतील हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि शेकडो सरपंचांनी शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला. या पक्ष प्रवेशामुळे शिवसेनेची ग्रामीण भागातील पकड मजबूत झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मागील अडीच वर्षात महायुती सरकारने प्रचंड काम केले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार घेऊन आपण पुढे चाललो आहोत. विरोधकांच्या आरोपांना कामातून उत्तर दिले त्यामुळेच महाराष्ट्रात महायुतीची सरकार अभूतपूर्व बहुमताने सत्तेत आले. ते पुढे म्हणाले की, लाडक्या बहिणींनी निवडणुकीत सावत्र भावांना जागा दाखवली. फेसबुक लाईव्ह करणाऱ्यांना घरी बसवले. कोणत्याही पदापेक्षा २ कोटी ३९ लाख लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ हीच ओळख माझ्यासाठी मोठं पद आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. काही लोक म्हणत होते निवडणूक आयोग, सुप्रीम कोर्ट झाले आता जनतेच्या न्यायालयात जाऊ आणि खरी शिवसेना कोणाची हे जनता ठरवेल. जनतेने शिवसेनेचे ५७ आमदार आणि अपक्ष ३ असे एकूण ६० आमदार निवडून दिले आणि खरी शिवसेना कोणाची याचा फैसला केला, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आपल्या भागाचा विकास होईस, मुलभूत सोयी सुविधा केल्या जातील. आपल्या विश्वासाला तडा जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पक्ष प्रवेश केलेल्या हजारो कार्यकर्त्यांना यावेळी दिली. शिवसेना पक्ष कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. बाळासाहेब आपल्या सवंगड्यांना सहकारी समजायचे तर काहीजण पक्षातील सहकाऱ्यांना घरगडी समजायला लागले होते, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाला लगावला. विधानसभेप्रमाणेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीला विजयी करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. या पक्ष सोहळयात यावेळी खासदार नरेश म्हस्के, खासदार संदिपान भुमरे, आमदार राजेंद्र गावित, आमदार विलास तरे, आमदार शांताराम मोरे, रवींद्र फाटक आदि उपस्थित होते.

# कचरा संकलनात हलगर्जीपणा

## केडीएमसीकडून कंत्राटदाराचा ठेका रद्द

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कचरा संकलनात हलगर्जीपणा करणाऱ्या ३ प्रभाग क्षेत्रातील खासगी कंत्राटदाराचा ठेका रद्द करण्याचा निर्णय केडीएमसी प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. या तिन्ही प्रभागांमध्ये आता केडीएमसी प्रशासनाकडूनच सकाळऐवजी दुपारच्या सत्रात कचरा संकलन केले जाणार असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी केले आहे. तसेच केडीएमसी क्षेत्रात सात प्रभागांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या नविन खासगी एजन्सीचे कामही लवकरच सुरू होणार असून त्यानंतर हा सर्व प्रश्न मार्गी लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील बी, डी आणि जे या तीन प्रभागक्षेत्र कार्यालयांतर्गत कचरा संकलनासाठी आर अँड बी कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. मात्र या कंपनीकडून जुन्या झालेल्या कचऱ्याचा गाड्या, सतत उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्या आणि नादुरुस्त असलेल्या गाड्यांमुळे या तिन्ही प्रभागांतील कचरा संकलनावर मोठा परिणाम झाला होता. या प्रभागातील कचरा संकलन व्यवस्थित होत नसल्याबद्दल अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी केडीएमसी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. त्यावर केडीएमसी प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला रीतसर नोटीसही बजावली होती. मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणतीच सुधारणा न झाल्याने अखेर या कंत्राटदाराचा ठेका रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी दिली. तसेच त्यांच्याऐवजी आता केडीएमसीच्या सफाई कर्मचारी आणि यंत्रणेकडूनच बी डी आणि जे प्रभागांमध्ये कचरा संकलन केले जाणार आहे. मात्र हे काम सकाळऐवजी दुपारी २ ते रात्री १० या वेळेमध्ये केले जाणार असून त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन अतुल पाटील यांनी केले आहे.

तसेच केडीएमसी क्षेत्रातील ए बी आणि सी हे तीन प्रभाग वगळता उर्वरित ७ प्रभगांतील कचरा संकलन, वाहतूक आणि प्रक्रिया पद्धतीसाठी नविन एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या दोन ते अडीच महिन्यांमध्ये या एजन्सीचे काम सुरू होणार असून त्यानंतर या सातही प्रभागातील सफाई कर्मचारी आणि इतर यंत्रणा केडीएमसी प्रशासनाकडून ए बी सी प्रभागांमध्ये वळवण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणात ही यंत्रणा उपलब्ध झाल्यानंतर या तिन्ही प्रभागांमध्ये आणखी चांगल्या पद्धतीने साफ सफाई आणि स्वच्छतेचे नियोजन करणे शक्य होणार असल्याची महत्त्वाची माहितीही उपायुक्त अतुल पाटील यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर ही सर्व नविन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत ब, ड आणि जे प्रभागातील नागरिकांनी काही काळ कळ सोसून महापालिका प्रशासनाला आवश्यक सहकार्य करावे. तसेच कचरा संकलन करणारी गाडीला उशिरा झाल्यास रस्त्यावर, मोकळया जागेमध्ये किंवा उघड्यावर कचरा न टाकण्याचे करण्याचे आवाहनही उपायुक्त अतुल पाटील यांनी केले आहे.





# डिझेल इंजिनाचा प्रवास थांबणार

'झुक झुक झुक झुक आगीनगाडी धुरांच्या रेषा हवेत गाडी' हे गाणे ऐकून आणि वाफेचे इंजिन पाहणारी पिढी आता साठीत आहे. त्या पिढीने कोळसा इंजिनापासून वंदे भारतच्या सेमी हायस्पीडपर्यंत रेल्वे इंजिनाचा प्रवास पाहिला आहे. त्या पिढीने वाफेचे इंजिन इतिहास जमा होताना पहिले आहे. भारतीय रेल्वेने १९९७ मध्येच वाफेचे इंजिन निवृत्त करण्याचा निर्णय घेतला. वाफेच्या इंजिनांचा वापर पूर्णपणे बंद केला. कोळसा जाळून वाफ निर्माण करणाऱ्या इंजिनाची जागा डिझेल इंजिनाने घेतली. आता डिझेल इंजिन इतिहास जमा होऊ लागले आहेत. वाफेच्या इंजिनांच्या तुलनेत डिझेल इंजिने अधिक कार्यक्षम होती. त्यांची देखभाल कमी करावी लागत होती. परंतु आता आणखी नवीन तंत्रज्ञान आले. यामुळे रेल्वे सर्व डिझेल इंजिन निवृत्त केले जात आहे. त्याची जागा इलेक्ट्रीक इंजिन घेत आहेत. नुकतेच पश्चिम मध्ये रेल्वेने त्यांच्याकडे असलेली सर्व डिझेल इंजिन विक्रीसाठी भंगारात काढले आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा काढण्यात आली. परंतु प्रतिसाद न मिळाल्याने भंगारात डिझेल इंजिनाची विक्री होत आहे.

असे आले डिझेल इंजिन भारतात भारतात १८५३ मध्ये पहिली रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते ठाणे दरम्यान धावली. त्यानंतर वाफेच्या इंजिनापासून वंदे भारतच्या सेमी हायस्पीड इंजिनापर्यंत रेल्वे इंजिनाने प्रगती केली. १९४० च्या दशकात अमेरिकेमध्ये डिझेल इंजिनांचा वापर सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर डिझेल इंजिने वापरात आली. त्यावेळी भारतात वाफेचे इंजिन होते. ते अगदी धिम्या गतीने धावत होते. अमेरिकेतील डिझेल इंजिन १२० किलोमीटरच्या वेगाने धावत होते. त्यामुळे हे तंत्रज्ञान भारतात आणण्याचा विचार सुरु झाला. त्यासाठी अल्को लोको या कंपनीशी चर्चा सुरु झाली. त्यांनी भारतीय रेल्वेला डिझेल इंजिनाचे तंत्रज्ञान देण्यास होकार दिला. त्यानंतर उत्तर प्रदेशात १९६१ मध्ये डिझेल-विद्युत रेल्वे इंजिन निर्मितीसाठी पहिला रेल्वे इंजिन कारखान्याची निर्मिती झाली. वाराणसीमध्ये पहिला डिझेल इंजिन कारखाना सुरु झाला. २०१९ पासून डिझेल इंजिनाची निर्मिती बंद जानेवारी १९६४ मध्ये पहिले रेल्वे इंजिन राष्ट्राला समर्पित करण्यात आले. मार्च २०१९ पासून डिझेल इंजिनाची निर्मिती बंद झाली. आता फक्त इलेक्ट्रीक इंजिन बनवण्यात येते. पश्चिम मध्ये रेल्वेने सर्व डिझेल लोको इंजिन आता निवृत्त केले आहे. पश्चिम मध्य रेल्वेच्या इतिहासात ५२ वर्षानंतर डिझेल इंजिनाचा प्रवास थांबला आहे. आता त्याची जागा इलेक्ट्रीक इंजिनाने घेतली आहे.

आंतरराष्ट्रीय निविदा पण प्रतिसाद नाही पश्चिम मध्य रेल्वेचे पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे. यामुळे रेल्वेने ८० पेक्षा जास्त डिझेल इंजिन विक्रीसाठी निविदा काढली आहे. ही निविदा आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा काढण्यात आली. भारताच्या शेजारी देश ही डिझेल इंजिन घेतील, अशी अपेक्षा रेल्वेला होती. त्यामुळे श्रीलंका, बांगलादेश, नेपाळला बोलवण्यात आले. परंतु या देशांनीही डिझेल इंजिन खरेदीत रस दाखवला नाही. त्यामुळे शेवटी डिझेल इंजिनाची विक्री रेल्वेला भंगारात करावी लागली. जबलपूरमध्ये असलेले डिझेल इंजिन खरेदीसाठी जवळपासच्या राज्यातून भंगारवाले पोहचले आहेत. त्यातील काही इंजिन विकत घेऊन त्यांची तुकडे केले जात आहेत.

२० कोटींच्या इंजिनाची विक्री एका कोटीत डिझेल इंजिनाचे वजन ९६ हजार किलो आहे. त्यामुळे एखाद्या ठिकाणी नेऊन त्याचे तुकडे करणे त्यानंतर पुन्हा त्याची वाहतूक करणे अवघड आणि खर्चिक गोष्टी आहे. यामुळे रेल्वे ट्रॅकवरच डिझेल इंजिनाचे वेगवेगळे भाग केले जात आहे. डिझेल इंजिन कापण्यासाठी झारखंडवरुन विशेष टीम जबलपूरमध्ये आली. गॅस कटरने डिझेल इंजिन कापले जात आहेत. २० कोटींत विकत घेतलेले हे इंजिन एका कोटीत भंगारात विकले जात आहे.

डिझेल इंजिनपेक्षा इलेक्ट्रीक इंजिन स्वस्त १२ डब्बे असलेली रेल्वेसाठी एक डिझेल इंजिन सहा लिटर डिझेलमध्ये एक किमीचा प्रवास करतो. त्या तुलनेत इलेक्ट्रीक इंजिनचा खर्च कमी आहे. २५० किलोमीटर जाण्यासाठी इलेक्ट्रीक इंजिनाला ५ हजार मेगा वॅट वीज लागते. तसेच त्यामुळे प्रदूषणही होत नाही. पर्यावरणाचे संवर्धन होते. २०१९ मध्ये रेल्वेने ३१ वर्षांपेक्षा जास्त जुने असलेले ३०० डिझेल इंजिन निवृत्त केले होते. डिझेल इंजिनाचे सरासरी वय ३० वर्ष असते.

ओवरहॉलिंग केल्यानंतर त्यांचे वय पाच ते सहा वर्षांनी पुन्हा वाढते.भारतीय रेल्वेचा असाही प्रयोग भारतीय रेल्वेने डिझेल इंजिनाचे रुपातंर इलेक्ट्रीक इंजिनात करण्याचा कारनामाही केला आहे. २६०० ते २७०० हॉर्स पॉवर क्षमता असलेले डिझेल इंजिन ५ हजार ते १० हजार हार्स पॉवर असलेल्या इलेक्ट्रीक इंजिनात बदलले जात आहे. २२ डिसेंबर २०१७ रोजी सुरु केलेले हे काम २८ फेब्रुवारी २०१८ रोजी पूर्ण झाले होते. रेल्वेने ६९ दिवसांत डिझेल इंजिन इलेक्ट्रीक इंजिनात बदलले होते.डिझेलपेक्षा इलेक्ट्रीक इंजिन का असतात हलकी डिझेल इंजिन इलेक्ट्रिक इंजिनपेक्षा खूप जड असतात. इलेक्ट्रिक इंजिनमध्ये त्यापेक्षा अनेक कमी नवीन घटक असतात. इलेक्ट्रिक इंजिनला ओव्हर हेड उपकरणातून वीज मिळते. डिझेल इंजिनच्या तुलनेत इलेक्ट्रिक इंजिन प्रत्यक्षात ओएचईकडून वीज घेते. त्याचे रुपातंर करुन ते वापरण्यायोग्य बनवते. डिझेल इंजिन डिझेलच्या मदतीने इंजिनमध्ये वीज तयार करते आणि वापरते. यामुळे, डिझेल इंजिनमध्ये अधिक घटक असतात. यामुळे इलेक्ट्रिक इंजिन डिझेल इंजिनपेक्षा हलकी असतात. भारतीय रेल्वेचे लवकरच शंभर टक्के विद्युतीकरण होणार आहे. रेल्वेच्या ६६, ३४३ किलोमीटरमार्गापैकी आता २,१९९ किलोमीटर मार्गाचे विद्युतीकरण राहिले आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये शंभर टक्के विद्युतीकरण झाले आहे. सन २०२३-२४ मध्ये ७,१८८ किलोमीटर मार्गाचे विद्युतीकरण करण्याचा विक्रम भारतीय रेल्वेने केले आहे. लवकरच आता शंभर टक्के विद्युतीकरण होणार आहे. यामुळे रेल्वेच्या सर्व विभागातून डिझेल इंजिन निवृत्त होणार आहे. डिझेल इंजिनाचा प्रवास इतिहासजमा होणार आहे.

## गीतासार



अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पाण्डवः । १-२० ।
हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
अर्जुन उवाच : सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत । १-२१ ।

**अर्थ**

महाराज, त्यानंतर ध्वजावर हनुमान असणाऱ्या पांडवाने (अर्थात पांडुपुत्र अर्जुनाने) युद्धाच्या तयारीने उभ्या असलेल्या कौरवांना पाहून, शस्त्रांचा वर्षाव होण्याची वेळ आली तेव्हा धनुष्य उचलून, हृषीकेश श्रीकृष्णांना असे म्हटले, हे अच्युता, माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी उभा करा. । १-२०, १-२१ ।


यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ।१-२२ ।

**अर्थ**

मी रणभूमीवर युद्धाच्या इच्छेने सज्ज झालेल्या या शत्रुपक्षाकडील योद्ध्यांना जोवर नीट पाहून घेईन की, मला या युद्धाच्या उद्योगात कोणाकोणाशी लढणे योग्य आहे, तोवर रथ उभा करा. । १-२२ ।

## ढगांनी वेढलेल्या ठिकाणाचा अनुभव घेण्यासाठी

### या ठिकाणाला जरूर भेट द्या



थंडीच्या दिवसात फिरायला जाण्याची मज्जाच काही और आहे. फक्त उन्हाळ्यातच नाही तर अगदी थंडीतही अनेकजण हिल स्टेशनवर जायला पसंत करतात. हिवाळ्याच्या सिजनमध्ये अनेकांना हिमवर्षाव पाहण्यासाठी हिल स्टेशनवर जायला आवडते. पण सगळ्यांनाच हिमवर्षाव पाहायला जायचे नसते. काही लोकांना अशा ठिकाणी जायचे आहे जिथे सर्वत्र हिरवळ असेल आणि हवामान देखील आल्हाददायक असेल. अशी ठिकाणी अनेकदा दक्षिण भारतात आहेत. तुम्हालाही अशा ठिकाणी जायचं असल्यास तुम्ही कर्नाटकला भेट देऊ शकता. बेंगळुरूच्या जवळ भेट देण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. अशी एक जागा बंगळुरूपासून अगदी ५५ किलोमीटर अंतरावर आहे. आज आपण या हिल स्टेशनबद्दल जाणून घेणार आहोत, जिथे तुम्ही हिवाळ्यात येथे भेट देण्याचा विचार करू शकता. चला जाणून घेऊया त्या ठिकाणाबद्दल...

**कोणती आहे ही जागा?**

कर्नाटक मधील नंदी हिल्स या जागेबद्दल आम्ही बोलत होतो. नंदी हिल्स हे अतिशय सुंदर आणि शांत ठिकाणांपैकी एक आहे. जर तुम्ही बंगलोर शहरात राहत असाल तर वीकेंडला इथे जाण्याचा प्लॅन करू शकता. याशिवाय भारतातील कोणत्याही ठिकाणाहून बंगलोरला सहज पोहचू शकता.

**फोटोग्राफीसाठी उत्तम ठिकाण**

जर तुम्हाला फोटोग्राफी करायची आवडत असेल तर तुम्ही इथे जाऊ शकता. येथे तुम्हाला सूर्योदयाची उत्कृष्ट झलक आणि निसर्गाची अद्भुत दृश्ये क्लिक करण्याची संधी मिळेल. नंदी हिल्सवरून सूर्योदयाचे दृश्य अतिशय विलोभनीय आहे. येथे ट्रेकिंग आणि सायकलिंग करण्याची संधी मिळते. याशिवाय इथल्या अनेक ऐतिहासिक नद्या आणि ठिकाणे पाहण्याची संधीही मिळते.

**नंदी हिल्सला जायचा बेस्ट सीजन कोणता?**


नंदी हिल्सला भेट देण्यासाठी ऑक्टोबर ते फेब्रुवारी हा हिवाळ्याचा सीजन बेस्ट मानला जातो. यावेळी तिथले हवामान आल्हाददायक आहे. मार्च ते मे या काळात येथील हवामान इतर राज्यांच्या तुलनेत थोडे थंड असते. मात्र दिवसा कडक ऊन आणि उष्णता असते. येथे पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या काळात भरपूर पाऊस पडतो. पावसाळ्यात नैसर्गिक सौंदर्य द्विगुणित होते, परंतु पावसाळ्यात डोंगरावर फिरणे कठीण होते.

**काय-काय बघायचं?**

नंदी हिल्सभोवती फिरण्यासाठी अनेक ठिकाणे आहेत. टिपू ड्रॉप हे तेथील सर्वात जुन्या पर्यटन स्थळांपैकी एक आहे. हे ठिकाण डोंगराच्या माथ्यावर एका खडकावर वसलेले आहे. त्याच्या माथ्यावरून डोंगररांगांचे अप्रतिम दृश्य दिसते. याशिवाय तुम्ही तेथील मंदिरातही जाऊ शकता. योगानंदेश्वर मंदिर येथे डोंगर शिखराच्या काठावर आहे जेथे दर्शनासाठी जाता येते. याशिवाय ब्रह्मश्रममधील गुहा शोध, अमृता सरोवर, चिक्कबल्लापूर, मुद्देनहल्ली, मकालीदुर्ग किल्ला, लेपाक्षी आणि देवनहल्ली किल्ला अशी ठिकाणे पाहण्याची संधी मिळते.

## आरोग्य टिप्स

### हाड मजबूत करण्यासाठी खा या वस्तू




रागी : नमामी यांनी रागीला या यादीमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस केली. हे कॅल्शियमचे सर्वोत्तम स्रोत आहे. फॅक्चरचा धोका कमी करण्यास मदत करते. उष्णता पराभव करण्यासाठीही रागी चांगली आहे.


राजगीरा : राजगीरा किंवा ऐमारैंथ कॅल्शिअम आणि फॉस्फरसचा एक चांगला स्रोत आहे. ती पुढे व्हिटॅमिन डी साठी सूचित करते

तीळ : कॅल्शिअम, जिंक आणि मॅग्नेशिअमसाठी तीळ खाल्ला पाहिजे. या व्यतिरिक्त काजू, जिरे, पालक आणि ड्रमस्टिक यासारखे पौष्टिक गोष्टी देखील हाडांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

## काळा झालेला तवा असा करा चकाचक

प्रत्येकाच्या घरी तवा असतो आणि त्यावर चपत्या किंवा भाकऱ्या भाजल्या जातात. जर तुम्ही सतत तव्यावर चपात्या, भाकऱ्या बनवत राहिलात पण तो तवा व्यवस्थित स्वच्छ केला नाहीत तर तवा लवकर खराब होतो. तवा जास्त काळा आणि घाणेरडा दिसू लागतो. अशा परिस्थितीत काळा झालेला तवा कसा चकाचक करायचा, त्यासाठी सोपे उपाय कोणते हे जाणून घेऊया... कसा स्वच्छ करायचा तवा? तवा स्वच्छ करण्यासाठी तुम्हाला ३ गोष्टींची आवश्यकता असेल. या गोष्टी म्हणजे २ ते ३ चमचे मीठ, एक कापलेला लिंबू आणि २ चमचे व्हिनेगर.

सर्वप्रथम तवा मंद आचेवर ठेवा. यानंतर, तव्यावर मीठ टाका. मीठ गरम झाल्यावर अर्धा लिंबू तव्यावर चोळायला सुरुवात करा. यामुळे तव्यावरील घाण स्वच्छ होण्यास सुरुवात होईल. आता लिंबाच्या सालीवर जो काही लिंबाचा रस असेल तो व्हिनेगरमध्ये मिसळा आणि हे मिश्रण तव्यावर ओता. काही वेळनंतर, गॅस बंद करा. तवा थंड झाल्यानंतर, साबण किंवा लिक्विड सोपने घासून तो पूर्णपणे स्वच्छ करा. तुमचा तवा एकदम चमकेल आणि त्यावर कोणताही चिकटपणा किंवा काळेपणा दिसणार नाही. आजच तुम्ही नवीन तवा घेतल्यासारखा वाटेल.
या' टिप्स करतील मदत - तव्यावर चिकटपणा जमा होऊ नये म्हणून तो गरम पाण्याने धुता येतो. - तव्याला नीट साबण लावा आणि चांगला घासून घ्या, नंतर तो धुवून स्वच्छ करा. पॅन चकाचक होईल. - व्हिनेगर आणि पाणी समान प्रमाणात मिसळा. त्यात स्पंज बुडवा आणि नंतर पॅन स्वच्छ करा. - बेकिंग सोडा देखील तवा स्वच्छ करण्यासाठी देखील प्रभावी आहे. - बेकिंग सोडा आणि पाणी मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट तव्यावर लावा आणि काही वेळ ठेवा. थोड्या वेळाने नेहमीच्या पद्धतीने धुवा. तवा पूर्णपणे स्वच्छ होईल.







## श्रीकृष्णाला प्रसाद दाखवले जाणारे पदार्थ

कैक मंडळी कोणताही नवीन खाद्यपदार्थ बनवण्यापूर्वी त्याविषयी गुगलवर सर्च करतात. हे नवीन पदार्थ बनवून अनेकजण खाण्याचा छंद जोपासतात. २०२४ मध्ये खाद्यप्रेमींनी खाण्यापिण्यात अजिबातच माघार घेतली नाही. काही नव्या तर काही जुन्या रेसिपींना खवैय्यांनी भरभरून पसंती दिली. नुकत्याच जाहीर झालेल्या Top 10 most searched recipes in २०२४ च्या यादीमध्ये भारतीय सणासुदीला बनवल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांची संख्या जास्त आहे.

**१. आंब्याचं लोणचं**

आंब्याचे लोणचं हे जेवणासोबत तोंडी लावण्यासाठी बनवले जाते. याची आंबट-गोड आणि तिखट चव सगळ्यांना आवडते. उन्हाळ्याच्या दिवसात भारतात घरोघरी हा रुचकर खाद्यपदार्थ बनवला जातो.

**२. पॉर्न स्टार मार्टिनी**

हे एक विदेशी पेय आहे. भारतात या पेयाने खूप लवकर लोकप्रियता मिळवली. हे कॉकटेल पार्ट्यांमधील सर्वात आवडता ड्रिंक बनला आहे.

**३. धणे पंजिरी**

धणे पंजिरी सामन्यातः भगवान कृष्णाच्या प्रसादासाठी बनवली जाते. हा खाद्यपदार्थ बहुतेकदा कृष्ण जन्माष्टमीला बनवला जातो.

**४. फ्लॅट व्हाइट**

फ्लॅट व्हाइट या कॉफीला एस्प्रेसो आणि स्टीम्ड मिल्क यांपासून बनवली जाते. ही कॉफी सिरामिक्सच्या कपमध्ये सर्व्ह केली जाते.



**५. कांजी**

कांजी हे उत्तर भरतीय पेय गाजर आणि बीटपासून बनवले जाते. याचा रंग गडद गुलाबी असतो. हे आरोग्यवर्धक पेय खूप स्वादिष्ट लागते.

**६. शंकरपाळी**

शंकरपाळी ही एक दक्षिण भारतीय सणासुदीला बनवली जाणारी मिठाई आहे. ही अतिशय खुसखुशीत आणि रुचकर लागते.

**७. ईमा दत्शी**

ईमा दत्शी हा बहुचर्चीत भुटानी खाद्यपदार्थ आहे. तो बटाटा आणि पनीरपासून बनवले जातो. या चविष्ट ईमा दत्शीला भातासोबत सर्व्ह करतात.

**८. चरणामृत**

चरणामृत हे धार्मिक पेय आहे. वेगवेगळया मंदिरांमध्ये याचा प्रसाद दिला जातो. हे दूध, दही, मध, तूप आणि सुकामेवा या पाच वस्तूंनी बनवलं जातं. त्यामुळे याला पंचामृत असेही म्हणतात.

**९. मार्टिन ड्रिंक**

मार्टिन ड्रिंक हे खूप सर्च केलेल्या रेसिपींपैकी एक आहे. हे जिन्न, वर्माउथ आणि बिटर या पदार्थांपासून बनवले जाते.

**१०. चम्मंथी**

चम्मंथी ही दाहवी सर्वात जास्त पसंत केलेली पाककृती आहे. ही दक्षिण भारतीय रेसिपी कोथिंबीर, दही आणि मिरचीपासून बनवली जाते. याला भातासोबत सर्व्ह करतात.

# एचएमपीव्हीशी सामना करण्यास कल्याण डोंबिवली मनपा सज्ज !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** एचएमपीव्ही व्हायरसची लागण झालेले रुग्ण राज्यात आढळून आल्याने कल्याण डोंबिवली महापालिकेची आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून आरोग्य विभागाशी संबंधीत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश पालिका आयुक्त इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ल यांनी दिले आहेत..

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत क.डॉ.म.पा. कार्यक्षेत्रातील जनतेला सुचित करण्यांत येते की, चीनमध्ये असलेला विषाणु एचएमपीव्ही तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. मानवी मेटान्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणु आहे. ज्यामुळे श्वसन मार्गातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभुत ठरते. हा एक हंगामी आजार आहे. जो सामान्यत : आरएसव्ही आणि फ्ल्यु प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. संक्रमित लोकांच्या संपर्कात आल्याने संसर्ग वेगाने पसरु शकतो. संसर्गाचा कालावधी ३ ते ५ दिवसाचा आहे. लहान मुले, वृध्द आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींना लवकर संसर्ग होतो. याबाबत नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिके अंतर्गत याबाबत जनजागृती करण्यांत येत आहे. तसेच याबाबत लक्षणाप्रमाणे असणारे औषधे उपलब्ध आहेत. नागरीकांनी खबरदारीचा एक भाग म्हणुन श्वसनाच्या संसर्गापासुन बचाव करण्यासाठी 'काय करावे, काय करु नये' यासंदर्भात शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत कडोंमपा कार्यक्षेत्रातील जनतेला प्रतिबंधात्मक सुचना देण्यांत येत आहेत.




## काय करावं? काय करु नये?

- खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यु पेपरने झाका.
- साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारीत सॅनिटायझरने आपले हात वांरवांर धुवा.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणा पासुन दुर रहा.
- भरपुर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन होईल याची दक्षता घ्या.
- संक्रमणाचा धोका लक्षात घेता हस्तांदोलन करणे टाळावे.
- आजारी लोंकाशी जवळचा संपर्क करणं टाळावं
  डोळे, नाक आणि तोंडाला वांरवार स्पर्श करणे टाळा.

> हा व्हायरस कोव्हीड सारखा जीवघेणा नसला तरी संसर्गजन्य असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे. ह्युमन मेटा न्युमो व्हायरास असे नाव असलेला हा व्हायरस आर एस व्ही प्रकारात मोडतो. हा व्हायरस नागरिकांच्या शरीरातील रोग प्रतिकार शक्तीच्या आधारे शरीरात ५ ते ९ दिवसांपर्यंत राहू शकतो; तरी, नागरीकांनी घाबरुन जाऊ नये कोणत्याही प्रकारची लक्षणे आढळुन आल्यास ताबडतोब नजीकच्या दवाखान्यात, रुग्णालयाशी संपर्क साधावा
> ❍ डॉ. दिपा शुक्ल, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

# तीन पिढ्यांचे वास्तव्य; तरीही आदिवासी हक्काच्या घरापासून वंचित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

पनवेल : आदिवासी बांधवांच्या ७४ कुटुंबीयांच्या तीन पिढ्या रोडपाली येथील फुडलॅण्ड कंपनीच्या मागील जागेवर वास्तव्य करुनही अजूनही हक्काच्या घरापासून वंचित राहिल्या आहेत. सध्या आदिवासी बांधव राहत असलेल्या जागेवर ट्रक टर्मिनलचे आरक्षण पनवेल प्रारुप विकास आराखड्यात आखल्याने आदिवासी बांधवांनी याबाबत हरकत घेतली होती. याच हरकतींवर बुधवारी पनवेल शहरातील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात सुनावणी झाली. या सुनावणीसाठी आदिवासी बांधव आले होते.

प्रारुप विकास आराखड्यावर दोन दिवसांपासून पालिकेने सुनावणी सुरू केली असून याच सुनावणी दरम्यान आदिवासी बांधवांच्या प्रतिनिधींनी हक्काचे घर मिळावे अशी मागणी विकास आराखड्यावर स्थापन केलेल्या पाच सदस्यांच्या समितीसमोर मांडली. आतापर्यंत ७८१ हून अधिक हरकतींवर सुनावणी पूर्ण झाली असून पुढील दीड महिन्यात ५,५८४ हरकतींवर सुनावणी घेतली जाणार आहे.

सिडको महामंडळाने रोडपाली व खिडुकपाडा येथील आदिवासी बांधवांना त्यांचा हक्काचा निवारा न देता थेट पनवेल महापालिकेला हस्तांतरण प्रक्रिया केल्यामुळे रोडपाली येथील फुडलॅण्ड कंपनीलगतच्या आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळण्याचा पेच वाढला आहे. १९७० च्या पूर्वीपासून सुरूवातीला २४ कुटूंब फुडलॅण्ड कंपनीच्या मागील बाजूस कासाडी नदी किनारपट्टीजवळ राहत होते. तशी नोंद सातबारावर



आहे. चार चाळींमध्ये २४ खोल्यांमध्ये आदिवासी बांधव राहत असल्याची नोंद असूनही सिडकोने पनवेल पालिकेला जमीन हस्तांतरणापूर्वी या आदिवासी बांधवांचे पुनर्वसन केले नाही.

मागील तीन पिढ्यांपासून येथे राहत असलेले पुरावे घेऊन याच वाडीतील एकनाथ वाघे, गुरुनाथ वाघे आणि युवासंस्थेचे सुजीत निकाळजे यांनी आदिवासी बांधवांच्या वतीने समितीसमोर बाजू मांडली. सर्व नोंदी पाहिल्यावर या नोंदीची खात्री करुन समिती पुढील अभिप्राय ठरविणार आहे. पनवेल प्रारुप विकास आराखडा सुनावणीसाठी स्थापन केलेल्या समितीमध्ये पनवेल पालिका आयुक्त मंगेश चितळे, नगररचना विभागाचे माजी संचालक सुधाकर नांगनुरे, सेवानिवृत्त नगर रचनाकार किशोर अग्रहारकर, शेखर चव्हाण, सेवानिवृत्त प्रधान वैज्ञानिक अधिकारी डॉ. अमर सुपाते हे सदस्य आहेत.

जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# महावितरणला जाग आली

## वसईतील उघड्या व तुटलेल्या वीज पेट्यांची मलमपट्टी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसईत उघड्या वीज पेट्या व संच यामुळे अपघाताच्या घटना समोर आल्या होत्या. याबाबत मानवी हक्क आयोगाने फटकारल्या नंतर महावितरणला खडबडून जाग आली असून शहरातील साडेतीन हजाराहून अधिक उघड्या व तुटलेल्या वीज पेट्या बंदिस्त करण्यात आल्या आहेत.वसई विरारमध्ये नागरिकांना महावितरणकडून वीज पुरवठा केला जात आहे. या वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणने विविध ठिकाणी ५ हजार ८४६ रोहित्र व १४ हजार ६८४ वीज पेट्या संच( डीपी बॉक्स) बसविले आहेत. हे संच मुख्य रस्ते व रहदारी असलेली ठिकाणे अशा भागात ही आहेत. काही ठिकाणी पेट्यांची दरवाजे तुटून गेल्याने ते उघडे होते. या उघड्या असलेल्या वीज पेट्यामुळे विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याच्या घटना शहरात घडल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी वसई पारनाका येथील भास्करआळी परिसरात सायकल वीज पेटीला धडकून नऊ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

# वीर यशवंतराव घाडगे यांची जयंती उत्साहात साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /बोरघर (विश्वास गायकवाड)

शहीद विर यशंवतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास आजच्या भावी पिढीपर्यंत पोहचला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी येथे केले. माणगाव येथे शहीद वीर यशंवतराव घाडगे व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्ह धारक (मरणोत्तर) यांचा जयंती समारंभ कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानी घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगाव प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप, प्रमुख अतिथी म्हणून कर्नल किशोरकुमार मोरे होते. तर उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी,घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसिल दार दशरथ काळे,वीर यशवंतराव यांचे वारसदार सुभाष घाडगे,माणगाव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, माणगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील,गटशिक्षणाधिकारी सुरेख तांबट, केंद्रप्रमुख शंकर शिंदे,माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष सहादेव खैरे,माजी अध्यक्ष विष्णू सावंत,पोलादपूर माजी सैनिक संघटना अध्यक्ष वाय.सी.जाधव,माणगाव नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे आदींसह आजी-माजी सैनिक,पोलीस अधिकारी-कर्मचारी, विविध शाळांचे शिक्षकवर्ग,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्हिक्टोरिया क्रॉस विजेते शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण केले. त्या पुढे म्हणाल्या की, माजी सैनिक यांच्या विश्रामगृहासाठी आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धतता करुन दिली जाईल. विश्रामगृहामध्ये वीर मरण आलेल्या सैनिकांची माहिती दिल्यास ती माहिती भावी पिढीला मार्गदर्शक ठरेल असे त्यांनी यावेळी सांगितले. वीर घाडगे यांच्या



वीर शौर्याची गाथा वर्तमान पिढीतील लोकांपेक्षा भावी पिढीपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी पुढील वर्षी होणार वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंती समारंभास माणगाव शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी तसेच तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना बोलविल्यास ही शौर्याची गाथा भावी पिढीपर्यंत पोहचून हा समारंभ अधिक मोठ्या प्रमाणात आपल्याला साजरा करता येईल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी पोलादपूर तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कर्नल किशोर कुमार मोरे, वाय.सी.जाधव, माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष सहादेव खैरे यांनी आपल्या मार्गदर्शनात शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या अतुलनीय शौर्याची माहिती दिली.

या समारंभाच्या प्रास्ताविकात घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगाव प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप म्हणाले की, वीर यशवंतराव घाडगे यांची स्मृती कायम रहावी म्हणून रायगड जिल्ह्यातील माणगाव उपविभागीय कार्यालयाजवळ त्यांचा कायमचा पुतळा उभारण्यात आला आहे. वीर यशवंराव घाडगे यांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीची स्मृती सतत जिवंत रहावी म्हणून माणगाव तहसिल कार्यालयामार्फत दरवर्षी ९जानेवारी रोजी त्यांचे कुटूंबिय, लोकप्रतिनीधी, प्रतिष्ठीत नागरीक व शाळा/कॉजेजमधील विद्यार्थी तसेच माणगाव, महाड, पोलादपूर, रोहा, म्हसळा, तळा या तालुक्यातील आजी माजी सैनिकांच्या उपस्थितीत मोठया प्रमाणात घाडगे उत्सव साजरा करण्यात येतो. या समारंभाला उपस्थित सर्वांचे आभार घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार माणगाव दशरथ काळे यांनी मानले.

# सरपंच हत्येच्या निषेधार्थ आबिटघर ग्रामपंचायतीचे कामकाज बंद




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)

सरपंच हत्येच्या निषेधार्थ आबिटघर ग्रामपंचायतीनीही कामकाज बंद करून पुकारलेल्या बंदला प्रतिसाद दिला.

बीड जिल्हातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याप्रकरणी त्यांना न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेने आज दि. ९ जानेवारी रोजी ग्रामपंचायत कामकाज बंद पुकारण्यात आला. या अनुषंगाने या पुकारलेल्या बंदला वाडा तालुक्यातील आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे यांनी प्रतिसाद देऊन ग्रामपंचायत कार्यालयात कै. संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली व त्या घटनेचा निषेध व्यक्त करून अत्यावश्यक सेवा वगळता बाकी पूर्णपणे कार्यालय बंद ठेवून सरपंच संघटनेने पुकारलेल्या बंदला प्रतिसाद दिला.

या निषेध आंदोलनावेळी ग्रामपंचायत सदस्य कुलदीप पाटील, सुरेश बोचल व कर्मचारी उपस्थित होते. तर यासाठी उपसरपंच सुप्रिया पाटील व इतर सर्व सदस्य यांनी देखील पाठिंबा देत सहकार्य दर्शविले.

# नवी मुंबई पोलिसांचा नशामुक्तीचा नारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
नवी मुंबई(प्रतिनिधी)

अमली पदार्थाच्या अवैध व्यवसायात अग्रभागी असलेल्या एक हजारांहून अधिक आफ्रिकन वंशाच्या नागरिकांना मायदेशी धाडण्याची कारवाई करणाऱ्या नवी मुंबई पोलिसांनी बुधवारी नशामुक्तीचा नारा देत 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाची सुरुवात केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या अभियानाचा शुभारंभ होताच पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी यापुढे कुणीही व्यक्ती नशेला बळी पडू नये यासाठी विशेष मोहिमांची आखणी केली जात असल्याचे यावेळी जाहीर केले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित नवी मुंबई, वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि 'नशामुक्त नवी मुंबई' या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते.

# लोकनेते आमदार किसन कथोरेंचा मुरबाड येथे जाहिर सत्कार!




## कोकण विभागीय विटभट्टी चालक मालक संघटनेच्या वतीने मुरबाड येथे भव्य सत्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(दिलीप पवार)

मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरे हे पाचव्यांदा आमदार होऊन विधीमंडळात गेल्याने कोकण विभागीय विटभट्टी चालक मालक संघटनेच्या वतीने आज मुरबाड येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.आमदार कथोरे यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा घेतल्यास अंबरनाथ तालुक्यातील सागाव ग्रामपंचायतचे सरपंच ते सभापती, जि.प.अध्यक्ष ते तब्बल पाचवेळा आमदार अशी भव्य दिव्य असा चढता राजकीय आलेख आहे. यावर्षीच्या महायुतीच्या मंत्री मंडळात त्यांची निश्चित वर्णी लागेल अशी सर्वांना अपेक्षा होती मात्र ते झाले नाही. यावेळी सत्कार समारंभाला उत्तर देताना आमदार कथोरे यांनी विटभट्टी चालक -मालक यांचे आभार मानले असून व्यवसायात येणार्या अनेक अडचणी सोडविण्यासाठी मी तुमच्या सदैव पाठिशी असल्याची ग्वाही दिली.यासंदर्भात राज्याचे महसूल मंत्री, आदिवासी मंत्री, पोलीस अधिकारी व विटभट्टी चालक मालक यांची मंत्रालयात म्हसा यात्रे नंतर बैठक लावणार असल्याचे सांगितले असून खोट्या अट्रासिटी, रॉयल्टी अशा महत्वाचे प्रश्नावर चर्चा होणार आहे. यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर खारिक, बंडू पाटील, भास्कर भोईर , श्री सांबरे, जि.प.सदस्य उल्हास बांगर, नितीन मोहपे, सुरेश बांगर, अनिल घरत, सचिन चौधरी, दिनेश उघडे, मनोज देसले, केशव देसले, संतोष पवार, तसेच संघटनेचे मुरबाड तालुका अध्यक्ष महेश देसले, बाळा बोंबळे, जगदिश हिंदुराव, मार्तंड टेकडे, कालीदास खाटेघरे, पेमारे ,भोईर, यांच्यासह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील अनेक विटभट्टी चालक मालक उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मुरबाडचा आवाज वैभव मंडलिक यांच्या सदाबहार संगित मैफिलीने मंत्रमुग्ध केले तर या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन ह.भ.प.रमेश शिंदे यांनी केले.

# 'अंमली पदार्थापासून बचाव' विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी)

'पोलीस स्थापना दिवस' पोलीस रेझिंग डे २०२५ चे औचित्य साधून ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोषजी डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय, ठाणे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस, गुन्हे शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल म्हस्के यांचे वतीने श्रीमती सावित्रीदेवी थीराणी विद्यामंदिर, वर्तकनगर व राजे शिवाजी



विद्यामंदिर, लोकमान्यनगर, ठाणे येथे दि.७ व ८ जानेवारी २०२५ रोजी शालेय समिती अध्यक्ष जयंत घाडगे, संचालक परदेशी सर व राव मॅडम यांच्या सहकार्याने अंमली पदार्थापासून बचाव या मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावीत, समाजसेवक तथा शिवसेना उप विभागप्रमुख गणेश संपत तांबे, पोलीस हवालदार हुसेन तडवी उपस्थित होते.

आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते, सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावीत यांनी विद्यार्थ्यांना नशे पासून कसा बचाव करावा व आयुष्य कसे घडवावे या विषयावर मार्गदर्शनपर करून भविष्यातील मदतीसाठी पोलीस अधिकारी सदैव सोबत असतील असे सांगितले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्गाने, ठाणे शहरातील युवा पिढीला अंमली पदार्थ विरोधी समाज प्रबोधन करत कारवाहीचा धडाका लावण्याऱ्या पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, जगदीश गावीत आणि गणेश तांबे यांचे आभार मानले.

# पालघरमध्ये सोनसाखळी चोरांना अटक

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ पालघर(प्रतिनिधी)

ठाणे, पालघर जिल्ह्याच्या विविध भागात काही महिन्यांपासून पादचारी महिला, पुरुष यांना एकटे गाठून त्यांच्या गळ्यातील सोन्याचा ऐवज चोरून नेणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी अटक केली आहे. यामधील दोन जण फरार आहेत. या चोरट्यांनी अशाप्रकारचे २० गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली. ते मुळचे गुजरातमधील आहेत.

कन्नुभाई सोळंकी, शरीफ खान अशी अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. या दोघांचे अन्य दोन साथीदार जिग्नेश घासी, जसवंत मीना हे फरार आहेत. पोलीस त्यांच्या मागावर आहेत. ही चोरीची घटना पौर्णिमा चौकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती.



## प्रेस असोसिएशन आयोजित
# पत्रकार दिन संपन्न



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(शरद शहाणे)

पत्रकार बापू वैद्य आणि सहकारी, व प्रेस असोसिएशन कल्याण डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.८ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १ यावेळेत विनायक हॉल श्री.गणेश मंदिर संस्थान डोंबिवली (पूर्व) येथे पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ज्येष्ठ पत्रकार सदाशिव उर्फ बापू वैद्य यांच्या पुढाकाराने सदर कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून १४४ कल्याण ग्रामीणचे आमदार माननीय राजेश गोवर्धन मोरे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून मा. माधवी पोफळे (जनसंपर्क अधिकारी/क.डों. म. पा. कल्याण मुख्यालय) व मा. हेमा मुंबरकर फ. वॉर्ड ऑफिसर (क.डों.म.पा डोंबिवली ) माजी नगरसेवक शिवसेना महेश पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षता मा. संजय पितळे (अध्यक्ष/ठाणे जिल्हा पत्रकार संघ) यांनी केली.

यावेळी मा.विष्णुकुमार चौधरी ( अध्यक्ष,कल्याण प्रेस क्लब), महादेव पंजाबी (संपादक/इंडीया टीव्ही न्युज कल्याण),शरद शहाणे (ज्येष्ठ पत्रकार आदि पत्रकार व मान्यवरांच्या उपस्थित होते.

४० वर्षाहून प्रदीर्घकाळ बापू वैद्य पत्रकारिता करत असुन कल्याण डोंबिवली येथिल पत्रकारांना शासकीय कोट्यातून हक्काचे घर मिळावे, या करिता त्यांचा संघर्ष मोठा असल्याचे सांगत शिवसेना आमदार राजेश मोरे यांनी बापू वैद्य यांचे कौतुक केले. पत्रकाराच्या घराच्या मागणीसाठी शासनाकडे आपण पाठपुरावा करू असे आश्वासन आमदार मोरे यांनी दिले.

यावेळी माजी नगरसेवक महेश पाटील यांनी सांगितले की पत्रकार हे समाजाला दिशा देण्याचे काम नेहमीच केले आहे. पत्रकाराच्या घरचा विषयबाबत आपण नेहमी महापालिकेशी पाठपुरावा करू असे सांगितले.

या वेळी उपस्थित पत्रकारांना पेन व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रेस असोसिएशन कल्याण डोंबिवली संघटनेच्या सचिव सारिका शिंदे संपादिका (आपला भगवा),व सह सचिव किशोर (नाना) पगारे (जय महाराष्ट्र ) शरद शहाणे (दैनिक जीवनदीप )यांनी विशेष मेहनत घेतली.

# संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समिती सभा संपन्न




दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(ह्रषीकेश जाधव)

आज दि. ०८/०१/२०२५ रोजी जिल्हास्तरीय संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समितीची सभा पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षते खाली दुपारी १२:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे आयोजित कण्यात आली होती.

सदर सभेमध्ये **Humen Melapnenunovirus (HMPV)** या आजाराविषयी उपाययोजना व राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचना अंमलात आणण्याकरीता आढावा घेण्यात आला.

यावेळी डॉ. संतोष चौधरी सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पालघर, डॉ. रामदास मराड जिल्हा शल्य चिकित्सक, शशिकांत साळुंके जिल्हा सर्वक्षण अधिकारी, डॉ. संदिप निंबाळकर सहा-संचालक कुष्ठरोग, डॉ. अजय ठाकरे साथरोग अधिकारी, डॉ. अश्विनी राव जिल्हा हिवताप अधिकारी इ. तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख / प्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.सभेमधे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी **ICMR / WHO** यांच्या सुचने प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग व आरोग्य विभाग जिल्हा परिषद यांच्या बरोबरीने सर्व विभागांनी **HMPV** या आजारा विषयी जिल्ह्यामध्ये जनजागृती करुन नागरिकांना घाबरुन न जाता योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.


कल्याण डोंबिवली महानगरपालिका
महिला व बालकल्याण विभाग

## जाहिर आवाहन

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत **'कन्यादान योजना व विधवा पत्नीस अनुदान'** लॉटरी पध्दतीने वितरित करणे या योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. या योजनेचे अर्ज सादर करण्याकरीता दिनांक ०८/०१/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तथापी, या योजनेतंर्गत अर्ज सादर करण्याच्या मुदतीत बदल करण्यात येत असून, दिनांक ३१/०१/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**जा. क्र. कडोंमपा/मबाकवि/मुका/१७६**
**जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/४०**
**दिनांक : ९/०१/२०२५**

**सही /-**
**(स्वाती देशपांडे)**
**उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**


# सासरच्यांच्या त्रासाला कंटाळून महिलेची आत्महत्या

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

सासरच्यांच्या त्रासाला कंटाळून २० वर्षीय महिलेने आत्महत्या केल्याचा प्रकार गुरुवारी भिवंडीतील फतामानगर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी आत्महत्या केलेल्या



महिलेच्या वडिलांनी तिच्या सारच्यांविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीच्या आधारे पोलीसांनी तिच्या नवरा, सासु आणि नणंदेच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# खरोशी प्राथमिक शाळेला संगणक भेट







दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

सारथी फाउंडेशन आणि शारदा विद्यामंदिर यांच्या कडून पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरोशी येथील शाळेला संगणक भेट देण्यात आला.तसेच माध्यमिक विद्यालय खरोशी येथील दहावीच्या विद्यार्थ्यांना नवनीत पेपर प्रश्नसंच भेट देण्यात आली.

आजच्या संगणकीय युगात प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकीय ज्ञान प्राप्त झाले पाहिजे व संगणक क्षेत्रात तो पुढे गेला पाहिजे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन शारदाश्रम विद्यामंदिर कडून अमृत महोत्सव वर्षानिमित संगणक संच प्राचार्य एस.बी. नगरकर यांनी प्राथमिक शाळेला भेट दिला.सारथीचे प्रमुख अशोक जंगले उद्योजक निलेश पवार शाळा व्यवस्थापन अध्यक्ष गणपत पाटील, मुख्याध्यापक किशोर म्हात्रे गणपत घरत गोपीनाथ पाटील चोव्हान सर, शाळेतील शिक्षकवर्ग यावेळी उपस्थित होते.

# खालापूर शिक्षक संघ वर्धापनदिन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा खालापूर यांच्या ८१ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने तालुक्यातील शिक्षक व शिक्षिका कलोते येथील मैदानावर एकत्र येत विविध खेळांचा आनंद लुटला. यातील महत्त्वाची म्हणजे पैठणीच्या मानकरी वावोशी केंद्रातील निता वैशंपायन यांना मानाची पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत संगीत खुर्ची विजेत्या जयश्री सुर्वे(प्रथम) स्नेहल पोतदार(द्वितीय)किर्ती धारणे (तृतीय) वैशाली पाटील(चतुर्थ) तर कोण जिंकणार पैठणी यात नीता वैशपायन(पैठणी विजेती ) किर्ती धारणे( उपविजेती)तरशुभांगी डमाले अनिता चव्हाण शिल्पा लवांडे सरिता बैसाणे यांनाही सन्मानित करण्यात आले.






तालुक्यातील १२ केंद्राचे शिक्षक शिक्षिका व माजी शिक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. मोहपाडा जांबरुंग देवन्हावे, खालापूर वावोशी, वावर्ले तोडली नारंगी, आत्तकरगाव, सावरोली मांजगाव, सारंग, पंचायत समिती खालापूर या केंद्रातील संघांनी भाग घेतला होता. याप्रसंगी माजी शिक्षक बाळाराम भोंगे, भगवान शेटे, राजन पाटील, भगवान खालापूरकर, नंदा मोहिते, हरिभाऊ भरत, सूर्यकांत देशमुख, अनिल म्हात्रे, जोशना लवाटे, नंदा शेटे, निशा देशमुख, गिरी मॅडम शिक्षक नेते दिलीप देशमुख, संदीप जाधव, उमेश विचारे संतोष पाटील, हेमंत म्हात्रे, दीपक पालकर, मारुती दासरे, बळीराम चव्हाण, सचिन कडू, कांचन कडू जयश्री सुर्वे, मनीषा माळी, अनिता चव्हाण, विठ्ठल देशमुख, धनाजी चिटे, जगदीश मोहीने, दादासाहेब गुंजाळ, आबासू कदम, हनुमंत गाडे, पोषण अधीक्षक दीपा परब, हर्षाली मोकल, म्हस्के अण्णा सर्वसाधन व्यक्ती केंद्र प्रमुख आदी २०० हुन अधिक शिक्षक या निमित्ताने एकत्र येत आनंद लुटला.

# कामगार कल्याण केंद्राच्या इमारतीसाठी ५ कोटींची तरतूद करावी

## - माजी आमदार नरेंद्र पवार यांची मागणी



**कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची घेतली भेट**

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

राज्य शासनाकडून कल्याण पश्चिमेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या कामगार कल्याण केंद्राच्या इमारतीसाठी आगामी अर्थसंकल्पात ५ कोटींच्या निधीची तरतूद करण्याची मागणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. नरेंद्र पवार यांनी राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची भेट घेत यासंदर्भातील निवेदन सादर केले.

राज्य शासनाकडून सर्वे नं. ६२ खडकपाडा, कल्याण पश्चिम या भूखंडावर कामगार कल्याण केंद्र मंजूर केले आहे. महाराष्ट्र कामगार मंडळ हे कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी सातत्याने कार्य करणारी शासन निर्मित संस्था आहे. राज्यामध्ये एकूण २३३ कामगार कल्याण केंद्र असून कामगार कुटुंबियांच्या अंतर्गत आणि बहिर्गत विकासासाठी विविध योजना आणि उपक्रम राबविले जातात. ज्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा आणि सांस्कृतिक आदींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर कल्याणात मंजूर झालेल्या कामगार कल्याण केंद्राची इमारत बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याची गरज माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे राज्याच्या आगामी अर्थसंकल्पात (२०२५-२०२६) कामगार कल्याण केंद्रासाठी ५ कोटींच्या निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी नरेंद्र पवार यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे केली आहे. त्यावर कामगार मंत्र्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे नरेंद्र पवार यांनी सांगितले.

# उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांचा निरोप समारंभ





दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

पेण उपविभागीय पोलिस अधिकारी शिवाजी फडतरे यांची बदली झाल्याने त्यांचा पेण येथील पोलिस व शांतता कमिटीच्या वतीने सत्कार करून निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी पोलीस निरीक्षक ब्राह्मणे, पोयनाड पोलीस निरीक्षक दराडे, आदिंसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी गेली दोन तीन वर्षे आलेल्या चांगल्या वाईट अनुभवाची माहिती देत फडतरे साहेबांनी केलेल्या कामाविषयी व सर्व सामान्य जनतेला दिलेले प्रेम व न्याय तसेच पोलिस बांधवांना दिलेली चांगली वागणूक व केलेले सहकार्य याविषयी शब्दसुमनानी कौतुक केले.

तसेच कायदेविषयक एक अभ्यासु व्यक्तिमत्त्व असून एक वरिष्ठ सहकारी म्हणून ते सर्वांना आपलेसे वाटतील यात तिळमात्र शंका नाही. सर्व पोलीस सहकारी तसेच शांतता कमिटी सदस्यांनी त्यांचा शाल भेटवस्तू देऊन सन्मान केला .सत्काराला उत्तर देताना सांगितले की पेण मध्ये मला चांगली माणसे जोडली गेली त्यामुळे काम करणे सोपे झाले तसेच पोलीस अधिकारी, सहकारी यांची मला चांगली साथ लाभली सहकारी विजय टेमघरे यांचे नाव घेतले व त्यांची स्तुती केली तसेच आई बद्दल असलेली श्रद्धा व अस्था यांचा त्यांनी उल्लेख केला. पेण येथे नवीन चार्ज घेतलेले कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांनीही त्यांचे मन भरून कौतुक केले यावेळी, काही पोलीस सहकाऱ्यांनी त्यांना गीत गाऊन निरोप दिला.

पेण,वडखळ,पोयनाड दादरी सागर, येथील सर्व पोलीस सहकारी तसेच शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# गांजा विक्रेता पोलिसांच्या तावडीत

## ११२३ ग्राम गांजा केला हस्तगत

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता / कल्याण(प्रतिनिधी)

वाढत्या गुन्हेगारी घटना रोखण्यासाठी कल्याणमध्ये परिमंडळ ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी नशेखोरांविरोधात कारवाई तीव्र केली असतांनाच अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या देखील मुसक्या आवळण्यास सुरवात केली आहे. अशातच गांजा विक्री करणाऱ्या एका इसमास खडकपाडा पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून ११२३ ग्राम गांजा हस्तगत केला आहे.

कल्याण मधील शहाड नजीक बंदर पाडा येथे कृष्णा किराणा स्टोअर जवळ एक इसम गांजा हा अमली पदार्थ विक्री करत असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याने खडकपाडा पोलिसांनी या ठिकाणी जाऊन माहितीची पडताळणी केली. मिळाली बातमीची खात्री झाल्याने पोलीस निरीक्षक एलडी साबळे यांच्यासह या ठिकाणी छापा कारवाई करण्यात आली. गांजा विक्री करणाऱ्या इसमास ताब्यात घेण्यात आले आहे. लक्ष्मण बाबू रेडी वय ४० वर्ष असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून तो विक्री करत असलेला ११२३ ग्रॅम वाजनाचा गांजा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. तसेच याबाबत एनडीपीएस कलम ८,२०**(B)** अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.हि कारवाई पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलिस निरीक्षक शिवले, सपोनि विजय गायकवाड, पोउपनि व्ही आर भालेराव यांच्या पथकाने केली आहे.

# कामगारांच्या विकासासाठी शासन कटिबध्द - मंत्री ॲड.आकाश फुंडकर

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता /कल्याण(प्रतिनिधी)

राज्यातील प्रत्येक कामगाराचा विकास हा केवळ आर्थिक पातळीवर नाही तर सामाजिक, मानसिक आणि शारीरिक पातळीवरही होण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री अँड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केले. मंत्रालयात कामगार मंत्री यांनी भारतीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी भारतीय मजदूर संघाचे क्षेत्रीय संघटन मंत्री सी. व्ही. राजेश, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अँड अनिल ढुमणे, प्रदेश महामंत्री किरण मिलगीर, विदर्भ प्रदेश



अध्यक्ष रवींद्र गणेशे, महामंत्री गजानन गटलेवार आणि भारतीय मजदूर संघाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.कामगार मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले की, महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक धोरण तयार करण्याबाबत चर्चा करण्यात येईल. तसेच कामगारांसाठी प्रत्येक जिल्ह्यात कामगार विमा रुग्णालय स्थापन करण्याबाबत शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल. असंघटित कामगारांच्या विकासासाठी निधी उभारण्याचे नियोजन असून या निधीच्या माध्यमातून असंघटित कामगारांसाठी विमा, आरोग्य या योजना राबवण्याच्या शासनाच्या विचाराधीन असल्याचे मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींनी यावेळी आपले निवेदन कामगार मंत्री अँड. आकाश फुंडकर यांना सादर केले असून कामगारांच्या समस्या, त्यांच्या अडचणी, आणि कामगार संघटनांच्या मागण्या, त्यांच्या अंमलबजावणीची स्थिती याबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेत भारतीय मजदुर संघ प्रदेश संघटन मंत्री बाळासाहेब भुजबळ, प्रदेश सचिव विशाल मोहिते, अखिल भारतीय ठेका मजदुर महासंघाचे अखिल भारतीय महामंत्री सचिन मेंगाळे, पुणे जिल्हा सेक्रेटरी सागर पवार, असंघटित क्षेत्र सह प्रभारी श्रीपाद कुटासकर, हर्षल ठोंबरे, कोषाध्यक्ष ॲड बाळकृष्ण कांबळे, घरेलु कामगार संघ प्रदेश अध्यक्ष शर्मिला पाटील, सरचिटणीस संजना वाडकर, प्रदेश सचिव व प्रदेश बांधकाम संघटनेचे अध्यक्ष हरी चव्हाण उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी